ePaper

| वर्ष - 6 | अंक - 336 | UDYAM-MH-26-0158827 |

## तर बाळासाहेबांनी अमित शहांना 'मिस्टर इंडिया' म्हटलं असतं": एकनाथ शिंदे



महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- 'महारेरा'ची ३९ गृहप्रकल्पांना नोटीस
- पिंपरी-चिंचवडला महाविकास आघाडीच्या सत्तेत काय मिळाले?
- केंद्र सरकारचा सर्वसामान्यांना मोठा दिलासा!

www.mahaenews.com | रविवार दि. 26 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## भाजप अन् काँग्रेस आमने-सामने... राहुल गांधींवरून

# पिंपरीत राजकारण तापलं!

### पिंपरीत भाजपच्या वतीने राहुल गांधींच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन

। पिंपरी। महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

**राहुल गांधींचे खासदारपद रद्द केल्याच्या निषेधार्थ काँग्रेसने आज सायंकाळी पिंपरीत केंद्र सरकार तथा भाजपविरोधात आणि राहुल गांधींच्या समर्थनार्थ आंदोलन केले. तर, मोदी या आडनावावरून अपमानास्पद टिप्पणी करताना तेली, ओबीसी समाजाचा अपमान केल्याबद्दल भाजपने पिंपरीत राहुल गांधींचा निषेध केला.**





राहुल गांधी हे आपल्या घराण्यामुळे आलेल्या राजेशाही मानसिकतेतून बाहेर पडलेले नाहीत असेच त्यांच्या वक्तव्यावरून दिसते, अशी टीका भाजपने यावेळी केली. तर, राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करणाऱ्या केंद्र सरकारचे काऊंटडाऊन सुरु झाल्याचा हल्लाबोल काँग्रेसने केला. भाजपने पक्षाच्या पिंपरीतील शहर पक्ष कार्यालयाबाहेर राहुल गांधींविरोधात आंदोलन केले. त्यात प्रदेश सचिव अमित गोरखे, शहर संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, विजय फुगे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके आदींनी भाग घेतला. यावेळी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले.

#### आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी सहभागी

राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केल्याच्या निषेधार्थ पिंपरीत त्यांच्या नेतृत्वात निषेध आंदोलन झाले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, ज्येष्ठ नेते गौतम अरकडे, वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, महिला शहराध्यक्ष सायली नढे, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष माऊली मलशेट्टी, युवक शहराध्यक्ष कौस्तुभ नवले, विजय ओव्हाळ यांच्यासह आदी सामील झाले होते.

#### भांडवलदार धार्जिण्या सरकारचे काउंटडाऊन

राहुल गांधी यांचे खासदार पद रद्द करणे म्हणजे लोकशाहीचा काळा दिवस असून हुकूमशाहीकडे वाटचाल आहे, अशी टीका काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष डॉ.कैलास कदम यांनी केली. संसदेत केंद्र सरकारला विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देण्याऐवजी बेकायदेशीररित्या राहुल गांधींचे खासदारपद त्यांनी संपुष्टात आणले. त्यातून या भांडवलदार धार्जिण्या सरकारचे आता काउंटडाऊन सुरू झाले आहे, असं ते म्हणाले.

## रुग्णालय यंत्र खरेदीत पुन्हा घोटाळ्याचा आरोप; आश्विनी जगताप ॲक्शन मोडवर!

### चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी; आमदार जगताप यांची मागणी

। पिंपरी। महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड : महापालिकेच्या प्रशासकीय राजवटीतील कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार चिंचवडचे स्वर्गीय भाजप (BJP) आमदार लक्ष्मण जगताप यांनी उघडकीस आणला होता. त्यांचा हा लढा त्यांच्या पत्नी चिंचवडच्या नवनिर्वाचित आमदार अश्विनी जगताप यांनीही पुढे सुरु ठेवला आहे.**

पिंपरी पालिकेच्या १५१ कोटी रुपयांच्या जॅकवेल बांधणी निविदेत २० ते २५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचे गतवर्षी सप्टेंबर महिन्यात लक्ष्मण जगतापांनी पालिका प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर त्यांनी पालिकेच्या वायसीएम रुग्णालयाच्या दीड कोटी रुपयांच्या हाय सक्शन मशिन खरेदीतील घोटाळा उघडकीस आणला.

हा प्रश्न थेट विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात त्यांनी उपस्थित केला होता.



या खरेदीत जनतेच्या कराचे पाऊण कोटी रुपये नाहक खर्ची पडले होते. यामुळे जगतापांनी याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.

त्यानंतर हा मशिन पुरवठा ठेका रद्द केला झाला होता.

दरम्यान, आ. लक्ष्मण जगतापांच्या निधनानंतर २६ फेब्रुवारीला झालेल्या चिंचवडच्या पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी अश्विनी निवडून आल्या.

#### दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी

त्यांनीही पतीच्या भ्रष्टाचाराचा लढा पुढे सुरु ठेवला. पिंपरी पालिकेच्या वायसीएम रुग्णालयाच्याच नवीन लाँड्री मशीन खरेदी निविदेतील घोटाळा त्यांनी समोर आणला. ही निविदा आर्थिक हितसंबंध जोपासणारी असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मर्जीतील ठेकेदारांना पात्र करण्यासाठी तिच्या अटीशर्ती तयार करण्यात आल्याचे सांगत. त्यामुळे आठ वर्षांत २१ कोटी ६९ लाख रुपयांच्या जनतेच्या पैशाची उधळपट्टी होणार असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे याबाबत चौकशी करून संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच फेरनिविदा प्रसिद्ध करावी, अशी मागणी अश्विनी जगतापांनी पालिका आयुक्त तथा प्रशासक शेखरसिंह यांच्याकडे आज केली.

# 'महारेरा'ची 39 गृहप्रकल्पांना नोटीस!

## नोंदणीशिवाय जाहिरात केल्याचं प्रकरण : 'महारेरा'ची 'कारणे दाखवा नोटीस'

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महारेरा नोंदणी क्रमांकाशिवाय जाहिराती करणाऱ्या ३९ गृहनिर्माण प्रकल्पांना महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने (महारेरा) 'कारणे दाखवा नोटीस' बजावली आहे. त्यात पुण्यातील आठ गृहप्रकल्पांसह मुंबई भोवतालच्या १६, नागपूर येथील तीन, नाशिकच्या दोन आणि औरंगाबादच्या एका प्रकल्पाचा समावेश आहे.**



'केंद्रीय स्थावर संपदा (विनियम व विकास) कायदा, २०१६'नुसार पाचशे चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या आणि किमान आठपेक्षा अधिक सदनिका प्रस्तावित असलेल्या इमारतींसाठी 'महारेरा'कडे नोंदणी करणे अनिवार्य आहे. याशिवाय कोणताही प्रवर्तक संबंधित प्रकल्पाची जाहिरात, विक्री किंवा अन्य कोणतीही प्रक्रिया करू शकत नाही. मात्र, असा नियम असतानाही काही बांधकाम व्यावसायिक, प्रवर्तक गृहप्रकल्पांची जाहिरात करीत असल्याची बाब 'महारेरा'च्या निदर्शनास आली.

### उल्लेख टाळणाऱ्यांना इशारा

दरम्यान, महारेरा नोंदणीक्रमांक असूनही काही ठिकाणी नोंदणीक्रमांकाचा उल्लेख करायचे टाळले जात असल्याचे 'महारेरा'च्या निदर्शनास आले आहे. अशा प्रकल्पांनादेखील काळजी घेण्याचे कळविण्यात आले आहे.

### 'महारेरा'तर्फे आवाहन

'आपली गुंतवणूक सुरक्षित आणि संरक्षित राहावी, यासाठी घर खरेदीदारांनी खबरदारी घेणे आवश्यक आहे. गृह खरेदीदारांनी 'महारेरा' नोंदणी क्रमांक नसलेल्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्याचे टाळावे, असे आवाहन 'महारेरा'च्या वतीने करण्यात आले आहे.

विविध योजनांच्या माध्यमातून खासगी बांधकाम व्यावसायिकांनी बांधलेल्या घरांमध्ये म्हाडासाठी घरे मिळवली जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून एक एकर किंवा त्याहून अधिक क्षेत्रफळावरील गृह प्रकल्पांत काही ठराविक फ्लॅट म्हाडासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय २०१४ पासून लागू करण्यात आला आहे. त्या फ्लॅटची म्हाडाच्या माध्यमातून बाजारभावाच्या तुलनेत स्वस्तात विक्री होते. मात्र, अनेक बांधकाम व्यावसायिकांकडून म्हाडाच्या या योजनेला प्रतिसाद दिला जात नसल्याचे दिसून येते. अशा गृह प्रकल्पांची माहिती

### सात दिवसांची मुदत

»संबंधित ३९ गृहप्रकल्पांच्या प्रवर्तकांना त्यांची बाजू मांडण्यासाठी नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. प्रवर्तकांनी या मुदतीत चुकांची दुरुस्ती करणे अपेक्षित असून, प्रतिसाद न देणाऱ्या विकसकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

### प्रकल्पाची नोंदणी आहे?

»'महारेरा'च्या वेबसाइटवर प्रकल्प पूर्णतेची तारीख दिलेली आहे ना? घर खरेदीकरार 'महारेरा'ने ठरवून दिलेल्या 'आदर्श घर खरेदी करारा'नुसारच आहे ना? तुम्ही दहा टक्क्यांपर्यंत रक्कम देऊन घरखरेदी किंवा नोंदणी करीत असल्यास विकसक घर विक्री करार करतोय ना? ज्यांच्यामार्फत हा व्यवहार करत आहात, ते मध्यस्थ 'महारेरा'कडे नोंदणीकृत आहेत ना? या सर्व बाबींची नागरिकांनी खात्री करून घ्यायला हवी.

# पुणे विमानतळावरुन प्रथमच २०० हून अधिक उड्डाणे; उन्हाळी हंगाम आजपासून सुरु!

## हंगाम 28 ऑक्टोबरपर्यंत चालणार: पुण्यातून नव्याने मुंबई आणि वाराणसी या दोन शहरांसाठी विमानसेवा सुरू

। पुणे। महाईन्यूज ।

**पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचा उन्हाळी हंगाम (समर शेड्यूल) येत्या २६ मार्चपासून सुरू होत आहे. या हंगामामध्ये हवाई दलाने सोमवार ते शुक्रवार २१८ प्रवासी उड्डाणांना परवानगी दिली आहे. रविवारी हवाई दलाने २४७ उड्डाणांना परवानगी दिली असली, तरी विमानतळ प्राधिकरणाने (एएआय) मात्र २०७ विमानांच्या उड्डाणांना परवानगी दिली आहे. त्यामुळे उन्हाळी हंगामात पुणे विमानतळावरून प्रथमच २००हून अधिक विमाने भरारी घेणार आहेत.**





पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सध्या दररोज १८० ते १९० उड्डाणे होतात. या माध्यमातून २८ ते ३० हजार प्रवासी प्रवास करतात. विमानतळाचा उन्हाळी हंगाम २६ मार्चपासून सुरू होणार असल्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे.

हा हंगाम २८ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. या हंगामात पुण्यातून नव्याने मुंबई आणि वाराणसी या दोन शहरांसाठी विमानसेवा सुरू होत असून, दुबई, सिंगापूर, बँकॉकसाठीच्या सेवाही सुरूच राहणार आहेत. उन्हाळी हंगामात पुणे विमानतळावरून प्रथमच २००हून अधिक विमाने भरारी घेणार आहेत

> "हवाई दलाकडून सोमवार ते शुक्रवारसाठी २१८ उड्डाणांना परवानगी देण्यात आली असून, १९५ उड्डाणांचे नियोजन करण्यात आले आहे. शनिवारी २१८ उड्डाणांना परवानगी असली, तरी १६४ उड्डाणेच होणार आहेत.पुणे विमानतळाचा उन्हाळी हंगाम २६ मार्चपासून सुरू होत आहे. या हंगामामध्ये २०८पर्यंत उड्डाणांना विमानतळ प्राधिकरणाने परवानगी दिली आहे. यंदा मुंबई आणि वाराणसी या दोन शहरांसाठी नव्याने सेवा सुरू होत आहे.
>
> - संतोष ढोके, संचालक, पुणे विमानतळ

# खडकवासला धरणाच्या रिकाम्या जागेत क्रीडांगण करा

। खडकवासला । महाईन्यूज ।



खडकवासला धरण परिसरातील रिकाम्याजागी अतिक्रमण होत आहे. याकडे आमदार भीमराव तापकीर यांनी विधानसभेत औचित्याचा मुद्दाद्वारे सरकारचे लक्ष वेधले. तेथे क्रीडांगण करण्याची मागणी त्यांनी आज विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी केली.

खडकवासला मतदार संघांमध्ये खडकवासला धरणाच्या बाजूला पाणलोट क्षेत्रालगत व लाभ क्षेत्राच्या बाजूला मोठ्या प्रमाणामध्ये जलसंपदा विभागाची मोकळी जागा आहे. हि जागा रिकामी पडून आहे. खरं तर त्या ठिकाणी अतिक्रमण वाढत आहे. त्या ठिकाणी योग्य नियोजन केले तर, त्या ठिकाणी गार्डन, क्रीडांगण, जॉगिंग ट्रॅक या ठिकाणी होऊ शकतो. गावातील आणि त्याचप्रमाणे शहरांमधील नागरिकांना त्याच्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणामध्ये उपयोग होऊ शकतो.

आज महाराष्ट्र विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये



# पिंपरी-चिंचवडला महाविकास आघाडीच्या सत्तेत काय मिळाले?

## आ. महेश लांडगे यांचा विधानसभा सभागृहात सवाल, मुख्यमंत्री, उपमुख्यंत्री यांच्या कामाचे केले कौतूक

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात वाढलेली गुन्हेगारी, असुरक्षितता कमी करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतंत्र पोलीस आयुक्तालय उभारण्याचा निर्णय घेतला. पोलीस आयुक्तालय सुरू झाले. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात पायाभूत सोयी-सुविधा मिळाल्या नाही. त्यामुळे राज्याच्या गृहविभागावर आरोप करताना महाविकास आघाडीच्या नेत्यांनी गेल्या २० वर्षांत पिंपरी-चिंचवडमध्ये प्रश्न प्रलंबित का राहिले? याचा विचार केला पाहिजे, असा सवाल भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केला. मुंबई येथे झालेल्या विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील अंतिम आठवडा प्रस्तावावर आमदार लांडगे बोलत होते. यावेळी राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामगिरीचे त्यांनी सभागृहासमोर कौतूक केले.**

आमदार महेश लांडगे म्हणाले की, राज्यतील विरोधी पक्षाच्या नेत्यांनी कायदा आणि सुव्यवस्थेबाबत गृहविभागावर आरोप केले. मी ज्या शहराचे प्रतिनिधीत्व करतो त्या ठिकाणी अनेक उद्योजक, कामगार, भूमिपूत्र वास्तव्य करतात. २०१४ ते २०१९ या काळात शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात होती. मात्र, शहरातील गुन्हेगारी आणि सुरक्षितता याबाबत पुण्याच्या पोलीस आयुक्तांकडे दाद मागावी लागत होती. मात्र, शहरातील नागरिकांची भावना लक्षात घेवून तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्षात घेवून स्वतंत्र पोलीस आयुक्तालयाचा निर्णय घेतला. त्यासंदर्भात पोलीस आयुक्तालयासाठी स्वतंत्र सायबर सेल, हाय पॉवर कमिटी तयार करण्यात आली. शहरातील वाढत्या गुन्हेगारीबाबत अनेकांनी आरोप केले. मात्र, २० वर्षे सत्ता असतानाही स्वतंत्र पोलीस आयुक्तालय उभारण्याचा प्रयत्न केला नाही. कामगार, उद्योजक सुरक्षित नव्हते. नागरिकांमध्ये भितीचे वातावरण होते. मात्र, पोलीस आयुक्तालयामुळे नागरिकांना दिलासा मिळाला.



### आळंदीतील धर्मांतराचे प्रयत्न उधळून लावले...

ज्यांनी संपूर्ण मानवजातील पसायदान दिले, असे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधीस्थळामुळे जगभरात प्रसिद्ध असलेले श्रीक्षेत्री आळंदीसारख्या पुण्यभूमीत धर्मांतर घडवून आणण्याचा मध्यंतरी प्रकार घडला. अक्षरश: द्राक्षांचे लाल पाणी हे रक्त आहे असे भासवून ते पिण्यासाठी देत हिंदू बांधवांना धर्मांतर करण्यासाठी प्रवृत्त केले जात होते. हा प्रकार शिंदे-फडणवीस सरकारच्या सहकार्यामुळेच हाणून पाडता आला, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. राज्यात अनधिकृत दारु विक्रीबाबत विरोधकांनी मागणी केली. याबाबत आम्ही सहभागी आहोत. परवानाधारक विक्रेत्यांनी व्यावसाय करावा. याला दुमत नाही. मात्र, रहिवाशी इमारतींमध्ये दारुचे दुकान थाटले जाते. त्यामुळे कोणताही दारु विक्रेताचा परवाना देताना ज्या सोसायटीमध्ये, इमारतीमध्ये राहणाऱ्या माता-भगिनींच्या भूमिकेचाही विचार झाला पाहिजे. कारण, महिलांचे मोर्चे निघायला लागले आहेत, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी सभागृहात केली.

### शिंदे-फडणवीस सरकारमुळेच गोरक्षकांवरील गुन्हे मागे...

» महाविकास आघाडीच्या काळात पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या पायाभूत सोयी-सुविधांबाबत मागण्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले. मात्र, शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात पोलीस आयुक्तलयात मनुष्यबळ, पायाभूत सुविधांकडे प्राधान्य देण्यात आले. पोलीस प्रशासनाचे उत्तम काम पिंपरी-चिंचवड शहरात सुरू आहे. त्याचे श्रेय राज्याच्या गृहविभागाला आहे. २००४ पासून पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील गोरक्षकांवर गुन्हे दाखल झाले होते. शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात गोरक्षकांना संरक्षण मिळाले. गायीला आपण गोमाता म्हणतो. तीच्यापासून मिळणाऱ्या प्रत्येक उत्पादनाचा मानवजातीला फायदा आहे. मात्र, गोरक्षकांना संरक्षण देण्यासाठी अनेकदा मागण्या करुनही तत्कालीन सरकारने दुर्लक्ष केले.

### अडीच वर्षात का विकासकामे केली नाही?

»सभागृहात विरोधी पक्षाचे नेते शिंदे-फडणवीस सरकारवर विविध विकासकामांबाबत आक्षेप घेत आहेत. मात्र, विरोधकांना माझा सवाल आहे. आठ महिन्यांपूर्वी आपणही सत्तेत होता. त्यापूर्वी २० वर्षे विरोधकांची सत्ता पिंपरी-चिंचवडमध्ये होती. तुम्ही सत्तेत असताना दूरदृष्टीने विकासकामे मार्गी लावली असती, तर प्रश्नच उपस्थित झाले नसते, असा घणाघातही आमदार लांडगे यांनी केला. पिंपरी-चिंचवड शहरातील उद्योजकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले महावितरण संदर्भातील विविध प्रस्ताव शासन दरबारी मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. त्याला मंजुरी मिळावी, अशी आग्रही मागणीही आमदार लांडगे यांनी सभागृहात केली.

---

# पिंपरीत लावणी महोत्सवास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद!

## दिलखेचक अदाकारींसह नृत्य सादर करत महिलांची जिंकली मने

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।



**शिट्ट्या, टाळ्या अन् जल्लोषपूर्ण खड्या आवाजाने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात दुमदुमून गेले. ‘या रावजी, बसा भावजी’, ‘इचार काय हाय तुमचा’ यांसारख्या रंगतदार लावण्या ढोलकीच्या तालावर रंगमंचावर एका पाठोपाठ सादर करण्यात आल्या. लावणी नर्तिकांनी दिलखेचक अदाकारींसह नृत्य सादर करत महिलांची मने जिंकली. या लावण्याना महिलांकडून मिळत असलेल्या प्रतिसादाने वातावरणात रंगत भरली. शिट्ट्या टाळ्यांसोबत लावणी अदाकाराबरोबर सेल्फी घेण्याचा मोह देखील महिलांना आवरता आला नाही.**

निमित्त होते लावणी महोत्सवाचे! लावणी कला पुनर्जीवित करण्यासाठी, पारंपरिक लावणी जपण्यासाठी आमदार उमा खापरे आणि महापालिकेच्या माजी विरोधी पक्षनेत्या सुलभा उबाळे यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय लावणी महोत्सवाला शनिवारी सुरुवात झाली. प्रसिद्ध कथक नर्तक डॉ. पं. नंदकिशोर कपोते यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि नटराजाची पूजा करुन कार्यक्रमाला सुरुवात झाली. लावणीसम्राज्ञी आणि परीक्षक सुरेखा पुणेकर, मेघा घाडगे यांच्यासह खापरे, उबाळे यांच्यासह माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, शैला मोळक आदी महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. यावेळी स्मृतिचिन्हांचे अनावरण करण्यात आले. महिलांच्या गर्दीने सभागृह खचाखच भरले होते.

लावणी महोत्सवाची सुरुवात गणेशवंदनाने झाली. ‘मी राजसा तुम्हासाठी’ या संघाने पहिल्या लावणीचे सादरीकरण केले. लांवण्यावतींनी पारंपरिक लावण्या सादर केल्या, अदाकारी सादर केल्या. नखशिखांत सजलेल्या नृत्यगंनांनी लावण्या सादर करत

### महिलांनी नृत्याचा आनंद लुटला

» लावणी महोत्सवात पारंपरिक पद्धतीने लावण्यांचे सादरीकरण झाले. महिलांनी जागेवर उभे राहून लावण्यांना दाद दिली. नृत्याचा मनमुराद आनंद लुटला. टाळ्या, शिट्या वाजविल्या. पारंपरिक वेशभूषेत, नववारी, फेटे परिधान करुन महिला आल्या होत्या. महिलांनी लावण्यांचा मनमुराद आनंद लुटला. लावणी महोत्सवाला महिलांचा प्रतिसाद मिळाला.

### लावणीची देशभरात सर्वांना भुरळ

» पिंपरी-चिंचवड शहरात प्रथमच राज्यस्तरीय लावणी महोत्सव आयोजित केल्याचा आनंद आहे. आजच्या युगात पारंपरिक लावणी लोप पावत चालली आहे. महाराष्ट्रात लावणी कला अतिशय महत्वाची कला आहे. आजच्या काळात लावणीचे रूप बदलत चालले आहे. त्यासाठी पारंपरिक लावणी जपणे खूप महत्वाचे आहे. लावणीची महाराष्ट्र नव्हे तर देशभरात सर्वांना भुरळ असल्याचे डॉ. नंदकिशोर कपोते म्हणाले. महिलांना काही तरी वेगळे द्यावे, यासाठी लावणीची लोककला जपण्यासाठी आणि पारंपरिक लावणी जतन करण्यासाठी हा महोत्सव आयोजित करण्यात आल्याचे आमदार उमा खापरे म्हणाल्या.

## संपादकीय

# सामर्थ्य आहे सूचक प्रश्नांचे!

***चॅटजीपीटीचा सध्या बोलबाला आहे. त्याच्या प्रभावी उपयुक्ततेपासून ते त्यामुळे नोकऱ्या जातील काय? इथपर्यंत अनेक प्रश्न विचारले जात आहेत. त्यावरील उत्तरेही वेगवेगळी आहेत. पण सर्जनशीलता ही श्रेष्ठ असते हेच खरे.***

इंटरनेटवर सध्या 'चॅटजीपीटी'ने नुसता धुमाकूळ घातला आहे. बहुतांश लोकं त्याच्या संभाषण क्षमतेने अवाक झाले आहेत; आणि का नाही होणार? जसा एखादा सुविद्य-ज्ञानी उत्तर देईल तशी, व्याकरण-योग्य उत्तरे दिलेली पहिली की त्याच्यामागे असललेली 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय-आर्टिफिशिअल इंटेलिजन्स) हे क्षेत्र किती पुढे आले आहे, याची कल्पना येते. आतापर्यंत तुम्ही 'चॅटजीपीटी'विषयी इंटरनेटवर, लेखांमधून सर्वसाधारण माहिती वाचली असेलच.

आपल्यापैकी काहींनी ते वापरूनही पहिले असेल. त्याविषयी जरा सखोल विवेचन पुढे पाहू. 'चॅटजीपीटी' ही एक संभाषण-प्रणाली (चॅटबॉट) आहे. आपण प्रश्न विचारायचे, त्याने त्याची समर्पक उत्तरे द्यायची, अगदी दोन व्यक्तींमध्ये संभाषण होते त्याप्रमाणे. आतापर्यंत हे बघितले नसेल तर चॅटजीपीटी HTTPS://CHAT.OPENAI.COM/CHAT या संकेतस्थळावर अगदी फुकट उपलब्ध आहे. नक्की वापरून बघा!

चॅटजीपीटीच्या मागे जे तंत्रज्ञान आहे त्याचे नाव भाषा-प्रारूप (एलएम - लँगवेज मॉडेल) असे आहे. हे तंत्रज्ञान समजण्यासाठी त्याला साधर्म्य असणारे आणि रोजच्या व्यवहारातील एक उदाहरण पाहू. आपण मोबाईलवर जेव्हा संदेश (एसएमएस) टाईप करतो, तेव्हा आपल्याही पुढचा शब्द सुचवला जातो. आणि बऱ्याच वेळेला ते इतके चपखल असतात की, आपल्याला वाटू शकते की मोबाईल आपल्या मनातले कसे ताडू शकतो? या मागचे तंत्रज्ञान समजायला सोपे आहे. तुम्ही सध्या जे टाईप करत आहात तसे तुम्ही कधी टाईप केले आहे का, ते तो पाहतो आणि तसे पूर्वीचे संदेश पाहून त्याला समजू शकते की, पुढे कुठला शब्द येणार आहे.

समजा, तुम्ही टाईप करताय "लेट्स गो फॉर अ....". अशा प्रकारचे संदेश तुम्ही अनेक वेळेला पाठवले आहेत. त्या सर्वांमध्ये पुढचा शब्द, सर्वात जास्त वेळेला, 'कॉफी' असा असेल तर तो 'कॉफी' हा शब्द सुचवेल.

# पुरे झाला विजेबाबतचा खेळ आणि खेळखंडोबा...






स्टीव्हन मॅगी यांनी त्यांचे बी.ए. व एम.ए. टेक्सास टेक युनिव्हर्सिटीमधून व पीएच.डी. मसॅच्यूसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधून केले असून, ते टॉक्सिक इलेक्ट्रिसिटी व इतरही अनेक पुस्तकांचे लेखक आहेत. ते किरणोत्सार व मानवी आरोग्य या विषयावरील जागतिक पातळीवरचे आघाडीचे तज्ज्ञ आहेत. त्यांनी वास्तुकलेतील "मल्टिपल सन" इफेक्ट सर्वांसमोर आणला व मानवी समाजामध्ये सौर किरणोत्साराची पातळी अनैसर्गिकपणे जास्त असल्याचे त्यांना आढळले. विजेसारख्या विषयावर अतिशय अधिकारवाणीने बोलू शकत असल्यामुळे, स्टीव्ह वरील अवतरणामध्ये अतिशय साध्या परंतु अतिशय प्रभावी शब्दांमध्ये विजेशी खेळ न करण्याविषयी इशारा देतात. तसेच आजकालच्या आयुष्यामध्ये फक्त "रोटी, कपडा और मकान" म्हणजेच अन्न, वस्त्र व निवारा याच केवळ मूलभूत गरजा राहिलेल्या नाहीत, तर वीजही तितकीच महत्त्वाची आहे. कारण विजेशिवाय आपल्या १५० कोटींहून अधिक देशवासीयांसाठी वरील सर्व गोष्टी साध्यच होणार नाहीत (मी फक्त आपल्या देशवासीयांबद्दल बोलतोय), त्याचशिवाय आपले सेलफोन चार्ज करायलाही वीज लागते हे विसरू नका, ज्याच्याशिवाय आपल्यापैकी बहुतेकांना श्वासही घेता येणार नाही. म्हणूनच अलीकडे जेव्हा 'महावितरण'च्या जवळपास ३५% पेक्षाही अधिक वीज दरवाढ करण्याच्या प्रस्तावाविषयी बातम्या येत होत्या तेव्हा मी विजेविषयी स्टीव्हन यांचे अवतरण वापरण्याचा विचार केला. कारण आपण (होय, आपण सर्व) आपापल्या परीने कुठेतरी विजेशी खेळ करत आहोत आणि आता आपल्या चुका सुधारण्याची वेळ आलेली आहे.

'महावितरण'संदर्भातली अलीकडची बातमी अशी होती की एमएसईडीसीएलने पुरवठा केल्या जाणाऱ्या बहुतेक वर्गवाऱ्यांमध्ये प्रति युनिट ३५ टक्के वीज दरवाढ करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. आता वर्गवारी म्हणजे काय असा प्रश्न तुम्हाला पडला असेल, तर त्याचा अर्थ वीज तीच असली तरी कोणत्या हेतूने विजेचा वापर केला जातो हे पाहून त्यानुसार प्रति युनिट वेगवेगळे दर आकारले जातात. म्हणजे विजेचा वापरकर्ता घरगुती किंवा निवासी असेल तर ७ रुपये युनिट दर असेल परंतु व्यावसायिक वापरासाठी दर रु.१२ युनिट दर असेल. ही यादी बरीच मोठी आहे. पण माझा प्रश्न निराळाच आहे : अशी वर्गवारी करण्याचे कारणच काय? आपल्याकडे तर पाणीपुरवठ्याच्या बाबतीतही असाच 'वर्गवारी'चा विनोद आहे. परंतु जगभरात कुठेही पाणी किंवा वीज यासारख्या अत्यावश्यक सेवांसाठी वेगवेगळे शुल्क आकारले जात नाही. विचार करा, तुमची कार खासगी असो किंवा घरगुती वापरासाठी असो किंवा तुम्ही तुमच्या कार्यालयाच्या किंवा व्यावसायिक कामासाठी तिचा वापर करत असाल, तुम्हाला तेच पेट्रोल जास्त दराने खरेदी करावे लागेल व जर तुमची कार तुम्ही स्वतःच्याच एखाद्या उद्योगासाठी वापरत असाल व त्यासाठी प्रति लिटर वेगवेगळे दर असते, तर तुम्हाला कसे वाटेल? आता आणखी एक उदाहरण घ्या, तुम्ही घरासाठी साधारण ५० रुपये लिटर दराने दूध घेतले

## हास्याचा झरा

**गेली १९ वर्षे राजकारण-समाजकारणाच्या अनुभवांची शिदोरी आता इतक्या लांबच्या प्रवासानंतर गाठीशी आहे; पण आजपर्यंतच्या चढउताराची, यशापयशाची, सुखदुःखाच्या क्षणांची आठवण मात्र नव्याने होत राहते.**

दुःख-अपयशाचे क्षण विसरून जावे आणि सुख, यशाच्या आनंददायी क्षणांची मैफल रंगून आयुष्य रुबाबदार व्हावे, यासाठी कायम प्रयत्न असतो. आयुष्यातील अनेक मजेदार क्षणांची आठवण आजसुद्धा चेहऱ्यावर केवळ स्मितहास्यच नाही, तर हास्याचा खळखळाट घेऊन येतात. तशीच ही आठवण आहे. आम्ही इतरांवर हसता-हसता स्वतःवरही हसावं आणि हास्याची कमान तयार व्हावी, अशी ही गोष्ट...



साधारण चार-पाच वर्षांपूर्वीची गोष्ट असेल, मी माझ्या जनसंपर्क कार्यालयामध्ये नेहमीप्रमाणे नागरिकांच्या गाठीभेटी घेत होते. काही बैठका घेत बसले होते. एक महिला तिच्या पतीसोबत कार्यालयात आली, कार्यक्रमाचे निमंत्रण घेऊन. मी त्यांना सांगितले, "ताई, आपण ज्या दिवसाची वेळ सांगतात, त्या दिवशी माझा स्वतःचा बचत गटाचा कार्यक्रम आहे. आमची पूर्वतयारी चालू आहे आणि मला तुमच्या वेळेत येणे शक्य नाही."

नाराज होत त्या सांगायला लागल्या. "दर वर्षी आम्ही मोठा कार्यक्रम करत असतो. प्रचंड गर्दी आणि दिग्गज, नामवंत, प्रतिष्ठित मान्यवर असतात. तुम्ही महिला नेतृत्व करता, तुम्ही माझ्या कार्यक्रमाला नाही म्हणून एका उत्साही माहिलेचा हिरमोड करत आहात. तुमच्या हस्ते आम्हाला कर्तबगार महिलांचा सन्मान करायचा आहे." त्यांना सांगितले, "तुम्ही निदान तारीख तरी बदला, मी येईल." त्या म्हणाल्या, "आम्ही पुण्यातील पद्मावती येथील अण्णा भाऊ साठे सभागृह बुक केले आहे." मी म्हणाले, "मग निदान वेळ तरी बदला... म्हणजे मला येता येईल." तर त्या म्हणाल्या, "दीड-दोन हजार लोकांना पत्रिका गेल्या आहेत. वेळ बदलली तरी आम्हाला एवढ्या सगळ्यांना परत सांगणे शक्य नाही. आम्ही फेटेवाला, ढोल, ताशा पथक आणि महाराष्ट्रातून येणाऱ्या सगळ्या सत्कारमूर्ती यांची तयारी झालेली आहे. प्लिज, तुम्ही तुमचा कार्यक्रम एक दिवस पुढे घ्या."

बापरे.. माझा पण दीड-दोन हजार महिलांचा कार्यक्रम, संपूर्ण तयारी झालेली.. प्रमुख पाहुण्यांपासून अनेक मान्यवरांना आमंत्रित केलेले, हॉलपासून जेवणापर्यंतची तयारी झालेली... मी त्यांना सांगितले, माझा कार्यक्रम रद्द नाही होऊ शकत. तुम्ही दुसरे कोणीतरी पाहुणे बोलावा. मी नंतर तुमच्या कार्यक्रमाला येईन... तर त्या अक्षरशः रडत मला म्हणाल्या, "नाही ताई, काहीही करा, तुम्ही या. मी खूप तयारी केली आहे."

## ।। अभंगवाणी ।।



तीळ जाळिले तांदुळ ।
काम क्रोधे तैसे चि खळ ।।१।।
कां रे सिणलासी वाउगा ।
न भजतां पांडुरंगा ।।ध्रु.।।

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# केंद्राचा सर्वसामान्यांना दिलासा!

## » " एलपीजी सिलेंडरवर सबसिडीची घोषणा

। मुंबई। महाईन्यूज ।

**प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा देत केंद्र सरकारने घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरवर सबसिडी देण्याची घोषणा केली आहे. सरकारच्या या निर्णयामुळे सर्व सामान्य लोकांना स्वस्त दरात गॅस मिळणार आहे.**



माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांच्या नवीन अधिसूचनेनंतर, उज्ज्वला योजनेच्या 9.59 कोटी लाभार्थ्यांना प्रति वर्ष 14.2 किलो एलपीजी गॅस सिलिंडरवर 200 रुपये सबसिडी मिळणार आहे.

त्याचबरोबर सरकारने वर्षभरात 12 सिलिंडर भरण्यासही परवानगी दिली आहे. याचा अर्थ असा की केंद्रीय मंत्रिमंडळाने एका आर्थिक वर्षात 12 स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरवर 200 रुपये प्रति सिलेंडर सबसिडी मंजूर केली आहे.

उज्ज्वला योजनेंतर्गत अनुदान देणे सुरूच ठेवणार असल्याचे सरकारने म्हटले आहे. म्हणजेच या योजनेच्या लाभार्थ्यांना एलपीजी सबसिडीचा लाभ मिळत राहील. PMUY लाभार्थ्यांच्या सरासरी एलपीजी वापराबद्दल बोलायचे झाल्यास, 2019-20 मधील 3.01 रिफिलवरून 2021-22 मध्ये 3.68 पर्यंत 20 टक्क्यांनी वाढ झाली आहे.

### विनाअनुदानित सिलिंडरची किंमत

या महिन्यात केंद्र सरकारने विनाअनुदानित 14.2 किलोच्या सिलिंडरमध्ये 50 रुपयांची वाढ केली होती, त्यानंतर देशाची राजधानी दिल्लीमध्ये एलपीजीची किंमत प्रति युनिट 1,103 रुपये झाली आहे. त्याचवेळी, 19 किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलेंडरची किंमत 350.50 रुपयांनी वाढून प्रति सिलेंडर 2,119.50 रुपये झाली आहे.

### केंद्र सरकारवर किती बोजा पडणार आहे

» केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे 2022-23 या आर्थिक वर्षासाठी एकूण 6,100 कोटी रुपये आणि 2023-24 या आर्थिक वर्षासाठी 7,680 कोटी रुपये खर्च होणार आहे. हा बोजा केंद्र सरकारच्या तिजोरीवर पडणार आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर हे अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

### या कंपन्या आधीच अनुदान देत आहेत

»सर्व प्रमुख तेल विपणन कंपन्या इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (IOCL), भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL), आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (HPCL) 22 मे 2022 पासून हे अनुदान देत आहेत. अनेक कारणांमुळे एलपीजीच्या किमतीत वाढ झाल्याचे केंद्र सरकारने आपल्या निवेदनात म्हटले आहे. अशा परिस्थितीत उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना यापासून संरक्षण देणे गरजेचे आहे. यासाठी अनुदान मंजूर करण्यात आल्याने गरीब कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.

---

# शेतकऱ्यांच्या बचत गटांनी मिळून बांधला 'बंधारा'

## » कोरड्या पिंकांना मिळाला ओलावा

। बारामती महाईन्यूज ।

**बारामती तालुक्यातील कोरडवाहू क्षेत्रात उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता व्हावी या हेतूने तालुका कृषि कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि शिवशक्ती शेतकरी बचत गट, श्रीकृष्ण शेतकरी बचत गट आणि ग्रामस्थ यांच्या लोकसहभागातून वढाणे - काळखैरवाडी येथे 10 वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत. या बंधाऱ्यामुळे परिसरातील रब्बी पिकांसाठी पाणी उपलब्ध झाले आणि कोरड्या पिकांना ओलावा मिळाला आहे.**

### कालव्यामुळे बारमाही शेती होऊ लागली

»बारामती तालुक्यात निरा डाव्या कालव्यामुळे बहुतांश भागात बारमाही शेती होऊ लागली असली तरी बराचसा भाग हा कोरडवाहू क्षेत्रात येतो. मौजे वढाणे - काळखैरवाडी गावशिवाराचा यात समावेश आहे. या भागात सप्टेंबर ते नोव्हेंबर दरम्यान पावसाची तीव्रता आणि पाण्याचा प्रवाह कमी होत जातो. अशावेळी पिकांना संरक्षित सिंचन देणे, पशुधनास पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याकरिता पाणी अडविणे गरजेचे होते.



बारामती तालुक्यात निरा डाव्या कालव्यामुळे बहुतांश भागात बारमाही शेती होऊ लागली असली तरी बराचसा भाग हा कोरडवाहू क्षेत्रात येतो. मौजे वढाणे - काळखैरवाडी गावशिवाराचा यात समावेश आहे. या भागात सप्टेंबर ते नोव्हेंबर दरम्यान पावसाची तीव्रता आणि पाण्याचा प्रवाह कमी होत जातो. अशावेळी पिकांना संरक्षित सिंचन देणे, पशुधनास पिण्याचे पाणी उपलब्ध होण्याकरिता पाणी अडविणे गरजेचे होते.

कृषि विभागाच्यावतीने तालुक्यातील वढाणे - काळखैरवाडी गावातील शेतकऱ्यांना सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत वनराई बंधारे साखळी पद्धतीने बांधण्यासाठी प्रशिक्षण देवून प्रोत्साहित केले. गावात ठिकठिकाणी सभा घेऊन शेतकऱ्यांना वनराई बंधारा बांधण्याचे महत्व पटवून देण्यात आले. प्रथम नाल्याची पाहणी करून कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त पाण्याचा साठा निर्माण होईल या हेतूने केवळ सिमेंट खतांची रिकामी गोणी वापरुन माती व वाळू यांच्या मदतीने पाणी वाहणाऱ्या नाल्याच्या योग्य ठिकाणी प्रवाहाला आडव्या दिशेने बांध घालण्यात आले.

या वनराई बंधारेमुळे उन्हाळी हंगामाच्या सुरुवातीस रब्बी पिकासाठी मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला. परिणामी भाजीपाला पिकाखालील क्षेत्रात वाढ होऊन मुख्यत्वे मेथी, कोथिंबीर, कांदा, रब्बी ज्वारी, गहू, हरभरा व भाजीपाल्याचे 48 हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली. पशुधनास मुबलक पाणी मिळू लागले. गावातील भूजल पातळी तसेच विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली. गावामध्ये लोकसहभागातून कार्य करण्यासाठी ग्रामस्थांचा सहभाग वाढला.

शालेय विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे महत्त्व प्रत्याक्षिकामधून दाखविण्यात आले. गावामध्ये एकजुटीची भावना निर्माण होऊन शेतीच्या शाश्वत विकासासाठी स्थानिक नेतृत्वाची फळी निर्माण झाली. या उपक्रमात गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामस्थ, मंडल अधिकारी, कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहायक, बचत गटांचे सदस्य यांनी मोलाचा सहभाग घेतला. वनराई बंधाऱ्यामुळे झालेला लाभ लक्षात घेता पुढील वर्षीदेखील गावातील सर्व ओढ्यातील पाणी अशाचप्रकारे अडविण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे सुप्रिया बांदल, तालुका कृषि अधिकारी -मौजे वढाणे - काळखैरवाडीत 10 वनराई बंधाऱ्याच्या माध्यमातून उपलबध पाण्याचे नियोजन केल्यामुळे रब्बी पिकांचे उत्पादन घेण्यास मदत झाली. तालुक्यातील कोरडवाहू क्षेत्रातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून असे प्रकल्प राबविणे गरजेचे आहे. यासाठी कृषि विभागाचे पूर्ण सहकार्य राहील.

# विरोधकांची एकजूट!

## विजय चौकातील आंदोलनानंतर कार्यकर्ते ताब्यात

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

**काँग्रेस नेते राहुल गांधींविरोधातील कारवाईनंतर तृणमूल काँग्रेस, भारत राष्ट्र समिती आणि आपसह इतर विरोधी पक्षांनी भाजपवर तोफ डागली. राहुल गांधींची बडतर्फी तसेच, अदानी समूहाच्या गैरव्यवहारांसाठी 'जेपीसी' या दोन मुद्द्यांवर काँग्रेससह १२ विरोधी पक्षांच्या खासदारांनी शुक्रवारी विजय चौकात मोर्चा काढला. त्यानंतर घोषणाबाजी करणाऱ्या काँग्रेस, माकपच्या खासदार व कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.**




संसदभवनामध्ये शुक्रवारी सकाळी राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या दालनात झालेल्या बैठकीनंतर विरोधी पक्षांनी काँग्रेसच्या मोर्चात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. खरगेंच्या निवासस्थानी गुरुवारी झालेल्या काँग्रेस नेत्यांच्या बैठकीत मोर्चाचा निर्णय आधीच झाला होता. दुपारी साडेबारानंतर दोन्ही सभागृहांतील काँग्रेसचे खासदार तसेच, अन्य विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसदभवनातून विजय चौकात मोर्चा काढला. गेल्या आठवड्यातही विरोधकांनी 'ईडी'च्या मुख्यालयावर काढलेला मोर्चा विजय चौकात पोलिसांनी अडवला होता. यावेळी देखील पोलिसांनी कडक बंदोबस्त ठेवला होता. जमाव बंदी लागू करण्यात आल्याने घोषणाबाजी करणाऱ्या काँग्रेसच्या खासदार व कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी राहुल यांच्या अपात्रतेचे वर्णन धक्कादायक असे केले. राहुल गांधींची लोकसभेतून हकालपट्टी धक्कादायक आहे. देश अत्यंत कठीण काळातून जात आहे. त्यांनी संपूर्ण देशाला घाबरवले आहे. त्यांच्या अहंकारी सत्तेविरोधात १३० कोटी जनतेने एकजूट व्हावे लागेल," असे केजरीवाल यांनी सांगितले.

**» विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या दालनात झालेल्या बैठकीनंतर विरोधी पक्षांनी काँग्रेसच्या मोर्चात सहभागी होण्याचा निर्णय घेतला**

माकपचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनीही भाजपवर जोरदार टीकास्त्र सोडले. "भाजप आता राहुल गांधींप्रमाणेच विरोधी नेत्यांना लक्ष्य करण्यासाठी आणि त्यांना अपात्र ठरविण्यासाठी गुन्हेगारी स्वरूपाचा आणि बदनामीचा मार्ग वापरत आहे. हे निंदनीय आहे. ईडी-सीबीआयचा विरोधी पक्षांविरोधात होत असलेल्या घोर गैरवापराचा हा सर्वात वरचा भाग आहे. या हुकूमशाही हल्ल्यांचा प्रतिकार करा आणि त्यांना पराभूत करा," असे ट्वीट या ज्येष्ठ डाव्या नेत्याने केले.

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी केंद्र सरकारवर टीका केली. "राहुल गांधी यांची अपात्रता ही सुडाची लढाई आहे. आजच्या 'अमृतकाल'मध्ये विरोधी नेते आणीबाणीच्या परिस्थितीत जगत आहेत. भाजपकडून सत्तेच्या प्रत्येक साधनाचा वापर करून विरोधकांना जबरदस्तीने गप्प केले जात आहे," असे सोरेन म्हणाले. शिवसेनेच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी देशातील लोकशाहीच्या स्थितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

## सत्ताधारी पक्षाचे सुडाचे राजकारण!

» काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांचे लोकसभेचे सदस्यत्व रद्द केल्याच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी सत्ताधारी भाजप सरकारवर जोरदार टीका केली. "सत्ताधारी पक्ष सुडाच्या राजकारणात गुंतला असून लोकशाहीसाठी हे धोकादायक आहे," अशा शब्दांत विरोधी पक्षांनी भाजपवर हल्लाबोल चढविला. काँग्रेसशी काही मुद्द्यांवर वाद असताना तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आणि आम आदमी पक्षाचे नेते अरविंद केजरीवाल यांनी या प्रकरणी राहुल गांधी यांची बाजू घेतली आहे. "पंतप्रधान मोदींच्या नव्या भारतात विरोधी पक्षांचे नेते हे भाजपचे मुख्य लक्ष्य बनले आहेत. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या भाजप नेत्यांना मंत्रिमंडळात समाविष्ट केले जाते, तर विरोधी नेत्यांना त्यांच्या भाषणासाठी अपात्र ठरविले जाते," अशी टीका ममता बॅनर्जी यांनी केली. आज आम्ही घटनात्मक लोकशाहीसाठी एक नवीन नीचांक पाहिला आहे, अशी टीका करत बॅनर्जी यांनी राहुल यांच्या समर्थनार्थ ट्वीट केले.

---

# "आजची रात्र सावध राहा"

## नैसर्गिक संकट : अमेरिकेत अलर्ट, 23 जणांचा मृत्यू

। नवी दिल्लीः।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शुक्रवारी रात्री अमेरिकेतील मिसिसिपी प्रदेशात भयावह चक्रीवादळ धडकलं आहे. वेगवान वाऱ्यासह धडकलेल्या या वादळात आतापर्यंत २३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर एक डझनहून अधिक लोक जखमी झाले आहेत. या वादळात काही लोक बेपत्ता असल्याची माहिती मिळत आहे. या वादळात सुमारे १०० मैलचा परिसर प्रभावित झाला आहे.'**



मिसिसिपीचे गव्हर्नर टाटा रीव्हस यांनी सांगितले की, मिसिसिपीला धडकलेल्या तुफान वादळात २३ लोकांचा मृत्यू झाला आहे. त्यांनी ट्वीट करत म्हटलं, "काल रात्रीच्या हिंसक चक्रीवादळात किमान २३ नागरिकांचा मृत्यू झाला. अनेकजण जखमी झाले आहेत, याची आम्हाला माहिती आहे. बचावकार्य आणि शोधमोहीम अद्याप सुरू आहे." "एमएस डेल्टामधील अनेकांना आज रात्री आपल्या प्रार्थनेची आणि देवाच्या संरक्षणाची गरज आहे. आम्ही वैद्यकीय मदत सुरू केली आहे. प्रभावित झालेल्या लोकांसाठी आणखी रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन सुविधा वाढवत आहोत. शोधमोहिम आणि बचावकार्य केलं जात आहे. आजची रात्र सावध राहा, सतत मिसिसीपीचा हवामान रिपोर्ट पाहत राहा," असं आवाहन गव्हर्नर रीव्हस यांनी केलं. दरम्यान, मिसिसिपी आपत्कालीन व्यवस्थापन संस्थेनं एक ट्वीट करत म्हटलं की, "शुक्रवारी रात्री आलेल्या चक्रीवादळात २३ जणांचा मृत्या झाला आहे. तर डझनभर लोक जखमी आहेत. याशिवाय अन्य चार लोक बेपत्ता झाल्याची माहिती मिळत आहे. आज सकाळपासून असंख्य स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचाव दलाकडून शोधमोहीम राबवली जात आहे. प्रभावित नागरिकांना मदत देण्यासाठी तातडीची पावलं उचलली जात आहेत."

# मोदी-अदानी संबंधांचा पर्दाफाश केल्याने कारवाई!



। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था।

**अदानी आणि मोदींच्या 20 हजार कोटींच्या गुंतवणुकीवरुन प्रश्न विचारल्यानेच माझ्याविरोधात खासदारकी रद्द करण्याची कारवाई करण्यात आली, असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. खासदारकी रद्द झाल्यानंतर त्यांनी शनिवारी पाहिल्यांदाच माध्यमांशी संवाद साधला.**

## राहुल गांधींचा आरोप

> देशाच्या लोकZशाहीचं, देशातील संस्थांचं रक्षण करणे, देशातील गरीब लोकांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचवणं आणि पंतप्रधानांशी असलेल्या नातेसंबंधाचा गैरफायदा घेणाऱ्या अदानींसारख्या लोकांबद्दल सत्य बोलणं हे माझे काम आहे. मी मोदी सरकारच्या धमक्यांना आणि आरोपांना घाबरत नाही.
>
> - राहुल गांधी, काँग्रेस नेते

## विधिमंडळात मूक आंदोलन

» अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कामकाजाचा आजचा शेवटचा दिवस असून, अधिवेशनाचे कामकाज सुरू होण्याअगोदर विरोधी पक्षनेते अजित पवार आणि अंबादास दानवे यांच्या नेतृत्वाखाली विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून हातात लोकशाहीची हत्या असे फलक घेऊन हे मूक आंदोलन करण्यात आले.

देशात आज लोकशाहीवर आक्रमण होत आहे. याची उदाहरणं रोज बघायला मिळतात. मी संसदेत मोदी आणि अदानींच्या संबंधावर प्रश्न विचारले होते. त्याचे पुरावेदेखील सादर केले होते.

# अंकुशला 'काका' म्हणणाऱ्या सनाने सांगितला त्याच्यासोबत रोमँटिक सीन

केदार शिंदे दिग्दर्शित 'महाराष्ट्र शाहीर' सिनेमातनं सना शिंदे मराठी सिनेइंडस्ट्रीत पदार्पण करतेय. सध्या या सिनेमातील तिच्यावर चित्रित झालेलं 'बहरला हा मधुमास नवा..' हे गाणं सोशल मीडियावर भलतंच ट्रेन्डिंगला आलं आहे.
सोशल मीडियावर या गाण्याच्या रील्सचा पाऊस पडतोय असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. सर्वसामान्यच नाही तर सेलिब्रिटी देखील या गाण्यावर ताल धरताना दिसत आहेत. सनाचा हा पहिलाच सिनेमा त्यातही थेट अंकुश चौधरीसोबत काम करण्याची संधी.
लहानणापासून ज्याला आपण 'काका' म्हणत आलो त्याच्यासोबत सिनेमात रोमँटिक सीन शेअर करताना सनानं स्वतःला कसं तयार केलं.. तसंच 'बहरला हा मधुमास..'



या गाण्याच्या हूकस्टेपमागची इंट्रेस्टिंग स्टोरी अशा अनेक गोष्टी नवोदित अभिनेत्री सना शिंदेनं 'ईसकाळ'शी मनमोकळ्या गप्पा मारत शेअर केल्या आहेत.
बातमीत पॉडकास्ट मुलाखतीची लिंक जोडलेली आहे.
तेव्हा सनानं साधलेला इंट्रेस्टिंग संवाद ऐकण्यासाठी नक्की ऐका ही पॉडकास्ट मुलाखत. महाराष्ट्र शाहीर सिनेमातील श्रेया घोषाल हिच्या आवाजातील आणि सना शिंदेवर चित्रित झालेल्या 'बहरला हा मधुमास नवा..' या गाण्यानं सध्या सोशल मीडियावर भलताच धुमाकूळ घातला आहे. याच गाण्याविषयी बोलताना सनानं याच्या मेकिंग मागचे अनेक किस्से शे्अर केले आहेत.
या गाण्याच्या सुरांवर अन् यातील हूकअप स्टेपवर सध्या सगळेच ताल धरतायत. पण ही स्टेप नेमकी आली कुठून अन् कशी यावर देखील सनानां या पॉडकास्ट मुलाखतीत खुलासा केला आहे. तेव्हा हे इंट्रेस्टिंग किस्से ऐकण्यासाठी सनाची पॉडकास्ट मुलाखत नक्की ऐका.शाहिर साबळे ज्यांच्या जीवनचरित्रावर आधारित आहे 'महाराष्ट्र शाहीर' हा सिनेमा. आणि सनाचे ते पणजोबा...आणि सिनेमात सना ज्या भानुमती साबळे यांची व्यक्तिरेखा साकारतेय त्या तिच्या पणजी.
त्यामुळे आपल्या पणजीसारखं दिसण्यासाठी... तिच्यासारखं चालण्या-बोलण्याची तयारी करताना कशी तयारी केली याचाअनुभही सनानं शेअर केला आहे. तसंच या भूमिकेसाठी जेव्हा पहिली लूक टेस्ट झाली तेव्हा काय होती सगळ्यांची रिॲक्शन हा किस्सा तर भन्नाट आहे. तेव्हा सना शिंदेनं साधलेला मनमोकळा संवाद ऐकण्यासाठी नक्की ही पॉडकास्ट मुलाखत ऐका.

# अर्जून कपूर आणि मलायकाची जोडी म्हणजे..


अभिनेता अर्जुन कपूर आणि मलायका अरोरा हे त्यांच्या रिलेशनशिपमुळे नेहमीच चर्चेत असतात. गेली अनेक वर्ष ते एकमेकांना डेट करत आहेत. आपल्या वयापेक्षा कितीतरी पटीने मोठी असणाऱ्या मलायका डेट करण्यावरुन अनेकदा अर्जूनला नेटकऱ्यांच्या ट्रोलला सामोरे जावे लागले आहे. मात्र, आता मलाईका आणि अर्जून एका नव्या कारणामुळे नेटकऱ्यांच्या निशाण्यावर आहेत.एका फिल्मी कार्यक्रमात अर्जून कपूर आणि मलायका अरोराला सहभागी झाले होते. या क्रार्यक्रमातील त्यांचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या व्हायरल होत आहे. या व्हिडिओवरून नेटकऱ्यांनी त्यांच्यावर निशाणा साधाला आहे. या दोघांच्या व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये एका यूजरने मलायका तिचा श्वास का रोखत आहे? असा प्रश्न विचारला आहे तर एकाने फ्लॉप बीएफ आणि जीएफ म्हणत दोघांना ट्रोल केले आहे. याशिवाय काही यूजर्स दोघांचे समर्थन करताना दिसले. या दोघांचे कौतुक करताना लोकांनी मलायका आणि अर्जुनला एक अप्रतिम जोडपे असे म्हटले आहे.कार्यक्रमात अर्जुन कपूरने जांभळ्या रंगाची कोर्ट पॅन्ट आणि काळ्या रंगाचा टी-शर्ट परिधान केला होता. यासोबतच त्याने सनग्लासेस लावले होते. या लूकमध्ये अर्जुन कमाल दिसत होता. तर मलायकाने काळ्या रंगाचा लाँग लाइनचा ड्रेस घातला आहे आणि तिचे केस पोनीटेलमध्ये बांधलेले आहेत. या लूकमध्ये मलायका खूपच सुंदर दिसत आहे.





# सिद्धार्थ मल्होत्राने पत्नी कियाराचं केलं कौतुक

अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा व कियारा अडवाणी यांनी काही दिवसांपूर्वीच लग्न केलं. या दोघांच्या लग्नाची सोशल मीडियावर खूप चर्चा झाली होती. त्यानंतर दोघंही बरेचदा एकत्र स्पॉट झाले आणि या जोडीला चाहत्याची चांगलीच पसंती मिळाली. अशातच सिद्धार्थने एका पुरस्कार सोहळ्यात केलेल्या कृतीने पत्नी कियाराने दिलेल्या प्रतिक्रियाची सध्या चर्चा आहे.
लग्नानंतर सिद्धार्थ मल्होत्रा कामाला लागला आहे. त्याने आगामी चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरवात केली आहे. नुकताच तो बॉलिवूड हंगामाच्या स्टाईल आयकॉन या पुरस्कार सोहळ्याला उपस्थित होता. या सोहळ्यात त्याला स्टाईल आयकॉन पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार स्वीकारताना सिद्धार्थ म्हणाला, लग्नानंतरचा हा माझा दुसरा पुरस्कार आहे, याआधी मला पहिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचापुरस्कार मिळाला आहे. त्यामुळे मला वाटते की माझी पत्नी कियारा खूप आनंदी असेल कारण ती स्वतः खूप चांगली अभिनेत्री आहे आणि खूप स्टायलिश आहे. अशी प्रतिक्रिया त्याने दिली आहे.कियारा सोशल मीडियावर कायमच सक्रिय असते.
सिद्धार्थचा हा व्हिडीओ कियाराने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केला. ज्यात तिने कॅप्शनमध्ये लिहले "या माणसाकडे माझे पूर्ण हृदय आहे." अशी प्रतिक्रिया तिने दिली आहे.



# त्या' प्रश्नाला वैतागून अमिताभ बच्चन यांनी रेखावर उचलला हात?

अभिनेत्री रेखा आणि अमिताभ बच्चन यांची जोडी पहिल्यांदा ४७ वर्षांपूर्वी म्हणजे १९७६ मध्ये 'दो अनजाने' चित्रपटातून एकत्र दिसली. तर १९८१ मध्ये प्रदर्शित झालेला 'सिलसिला' हा त्यांचा अखेरचा चित्रपट ठरला. या चित्रपटानंतर या दोघांनी कधीच एकत्र काम केलं नाही. पण आजही या जोडीचे असंख्य चाहते आहेत. या दोघांच्या पहिल्याच चित्रपटाच्या वेळी रेखा यांना अमिताभ बच्चन यांच्या रागाला सामोरं जावं लागलं होतं.'लावारीस' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान अमिताभ आणि रेखा यांच्यात खूप जवळीक निर्माण झाली होती. या चित्रपटात एक इराणी डान्सर काम करत होती आणि बिग बी या डान्सरच्या प्रेमात पडल्याची



बातमी समोर आली. मग काय रेखाने आव देखा ना तव पाहिला, अमिताभ बच्चन यांच्यासोबत प्रश्नोत्तरे करण्यासाठी सेटवर पोहोचली. रेखाच्या या प्रश्नाने अमिताभ यांनाही इतका राग आला की त्यांनी तिच्यावर हात उचलला.

# भारताच्या लेकीची सुवर्ण भरारी!

## चीनच्या वांग लिनाचे आव्हान मोडून काढत स्वीटी बूरा ठरली विश्वचॅम्पियन

।मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**दिल्लीत खेळल्या जाणाऱ्या IBA जागतिक महिला बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये भारताला सुवर्णपदक मिळाले आहे. स्वीटी बूरा हिने ८१ किलो वजनी गटात चीनच्या वांग लीना हिला हरवून सुवर्णपदक जिंकले. स्वीटीने हा सामना ४-३ अशा फरकाने जिंकला. स्वीटीने पहिल्या फेरीपासूनच चिनी बॉक्सरवर वर्चस्व राखले. तिने पहिल्या फेरीतच चिनी बॉक्सरच्या चेहऱ्यावर जोरदार पंचेस लगावले आणि पहिली फेरी ३-२ अशी जिंकली.**

महिलांच्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये नीतू घंघास नंतर आता स्वीटी बुराने सुवर्णपदक जिंकले आहे. स्वीटी बूरा हिने ८१ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले आहे. तिने अंतिम सामन्यात चीनच्या वांग लीनाचा पराभव केला. अशाप्रकारे भारताचे हे आजचे दुसरे सुवर्णपदक आहे. याआधी नीतू घंघासने मंगोलियन बॉक्सरचा पराभव करून भारताला दिवसातील पहिले सुवर्णपदक जिंकून दिले होते. आता स्वीटी बुराने चीनच्या खेळाडूला हरवून दुसरे सुवर्णपदक भारताच्या झोळीत टाकले आहे. त्याच वेळी, याआधी नीतू घंघासने ४८ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले होते.

निखत झरीन आणि लव्हलिना बोरगोहेन रविवारी अंतिम फेरीत प्रवेश करतील



निखत झरीन आणि लव्हलिना बोरगोहेन यांनीही महिलांच्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. निखत झरीन आणि लव्हलिना बोरगोहेन २६ मार्च रोजी अंतिम फेरीत भिडतील. अशा प्रकारे, ४ भारतीय बॉक्सर महिला जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत प्रवेश करू शकले. नीतू घंघास व्यतिरिक्त, स्वीटी बूरा, निखत झरीन आणि लव्हलिना बोरगोहेन यांनीही अंतिम फेरी गाठली. मात्र, नीतू घंघास आणि स्वीटी बूरा यांच्यानंतर आता भारतीय चाहत्यांच्या नजरा निखत झरीन आणि लव्हलिना बोरगोहेन यांच्यावरही असतील.

नऊ वर्षांपूर्वी स्वीटीला वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते. आता सुवर्णपदक जिंकून तिने ही अडचण दूर केली आहे. यावेळी, ३० वर्षीय स्वीटीने सुवर्णपदक जिंकण्यासाठी सर्व प्रयत्न केले आणि २०१८च्या विश्वविजेत्या वांग लीनाला तिच्यावर वर्चस्व गाजवू दिले नाही. २०१४ मध्ये दक्षिण कोरियामध्ये खेळल्या गेलेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये स्वीटी बूराला चीनच्या यांग झियाओलीकडून पराभवाला सामोरे जावे लागले होते आणि आता तिने चीनच्या बॉक्सरला हरवून सुवर्णपदक जिंकले आहे. सुवर्णपदक जिंकल्याबद्दल स्वीटी बूराला ८२.७ लाख रुपये मिळणार आहेत. रविवारी, सध्याची जगज्जेती निखत झरीन आणि टोकियो ऑलिम्पिकची कांस्यपदक विजेती लव्हलिना बोरगोहेन यांच्यात अंतिम लढत होणार आहे.

### नीतू घंघास हिने भारताला पहिले सुवर्णपदक मिळवून दिले

**भारतीय बॉक्सर नीतू घंघासने महिलांच्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकले. नीतू घंघासने ४८ किलो वजनी गटात मंगोलियाच्या लुत्सेखान अल्टेंगसेंगचा पराभव केला. भारतीय बॉक्सरने हा सामना ५-० असा जिंकला. तत्पूर्वी, शनिवारी नीतू घंघासने उपांत्य फेरीच्या सामन्यात कझाकिस्तानच्या बॉक्सरचा पराभव केला. त्याचवेळी स्वीटी बूराने भारताला दिवसातील दुसरे सुवर्णपदक मिळवून दिले.**

# अरेरे दुर्दैवः केकेआरचे नशिबंच फुटके

## कमिन्स, श्रेयस अय्यर पाठोपाठ तिसरा कर्णधारही संघाबाहेर

। कोलकाता । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**अजून IPL 2023 ला सुरुवातही झालेली नाही. त्यामुळे आयपीएलला सुरुवात होण्यापूर्वी आता KKR च्या संघाला मोठा धक्का बसला आहे. यापूर्वी कर्णधार पॅट कमिन्स खेळणार नसल्याचे समोर आले होते. त्यानंतर श्रेयस अय्यरला केकेआरचे कर्णधारपद मिळेल, असे म्हटले जात होते. पण आता श्रेयसला दुखापत झाली आहे आणि तो आयपीएल खेळणार नसल्याचे समोर आले आहे. त्यानंतर केकेआरचा संघ ज्या खेळाडूला कर्णधार बनवण्यासाठी उत्सुक होता तोदेखील आता आयपीएलच्या बाहेर पडला आहे.**

आयपीएल सुरु होण्यापूर्वीच दुखापतींचे पेव फुटलेले पाहायला मिळत आहेत. कारण आयपीएल सुरु होण्यापूर्वी संघांना एकामागून एक धक्के बसत आहेत. पण केकेआरच्या संघाला मात्र एकामागून एक धक्के बसत आहेत. त्यामुळे आता संघाचा कर्णधार करायचे तरी कोणाला, हा सर्वात मोठा प्रश्न केकेआरच्या संघापुढे असेल.

केकेआरचा संघ या हंगामात कर्णधार शोधत होता. त्यासाठी त्यांनी श्रेयस अय्यरला आपल्या ताफ्यात दाखल केले होते. पण अय्यरला पाठिची दुखापत झाली. त्यामुळे तो भारतीय संघातूनही बाहेर पडला. त्यानंतर आता तो आयपीएल खेळू शकणार नसल्याचे समोर येत आहे. त्यामुळे केकेआरचा संघ कर्णधाराच्या शोधात होता. न्यूझीलंडचा अनुभवी खेळाडू ल्यूकी फर्ग्युसन हा कर्णधारांच्या दावेदारांपैकी एक समजला जात होता. कारण ल्यूकीला आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा चांगला अनुभव आहे. पण आता त्याचे स्नायु दुखावले गेले असल्याची माहिती समोर आली आहे.

### न्यूझीलंड-श्रीलंका यांच्यामध्ये वनडे मालिकेला 23 मार्चपासून

**न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यामध्ये वनडे मालिकेला २३ मार्चपासून सुरुवात होणार होती. त्यापूर्वीच ल्यूकीला दुखापत झाल्याचे समोर आले आहे. या सामन्यापूर्वी ल्यूकीची फिटनेस चाचणी घेण्यात आली. पण तो या चाचणीत नापास ठरला आहे आणि त्यामुळे तो या मालिकेत खेळणार नसल्याची माहिती समोर येत आहे. आता काही दिवसांतच आयपीएल सुरु होणार आहे. त्यामध्येच स्नायूंची दुखापत व्हायला जास्त वेळ जातो, हे आतापर्यंत समोर आले आहे. त्यामुळे आता ल्यूकी आयपीएलमध्ये खेळणार नसल्याचे म्हटले जात आहे.**



# आशिया चषकः तिढा सुटला...

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



आशिया चषकाचा तिढा आता सुटला आहे. आशिया चषक आता पाकिस्तानमध्येच खेळवण्यात येणार आणि यजमानपदही त्यांच्याकडे असणार आहे. पण भारतही या स्पर्धेत खेळणार असल्याचे समोर आले आहे. भारताने पाकिस्तानात खेळण्यास नकार दिला होता. पण आता असं नेमकं घडलं तरी काय आहे याचा विचार सर्व चाहते करत आहेत. आशिया चषक जर पाकिस्तानात झाला तर भारत खेळणार नाही, असे बीसीसीआयने पूर्वीच म्हटले होते. पण आता ASIA CUP 2023 ही स्पर्धा पाकिस्तानमध्ये खेळवण्यात येणार असल्याचे समोर आले आहे. ही स्पर्धा पाकिस्तानमध्ये होणार असली तरी भारत यामध्ये खेळणार असल्याचेही आता समोर आले आहे. त्यामुळे आशिया चषकाचा तिढा आता सुटलेला आहे.

पाकिस्तानमध्ये आशिया चषक स्पर्धा होणार असेल तर भारता तिथे जाणार नाही, असे बीसीसीआयने स्पष्टपणे सांगितले होते. त्यानंतर जर भारत पाकिस्तामध्ये खेळण्यास येणार नसेल तर आम्हीदेखील त्यांच्या देशात वनडे विश्वचषक खेळायला जाणार नाही, असा धमकी वजा इशारा पाकिस्तानने दिला होता. त्यांनतरही बीसीसीआयला आपल्या निर्णयावर ठाम होती.